# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

- २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in internet : http://www.dte.org.in


**स्मरणपत्र**

क्रमांक :-२/एनजीसी/शै.कर्ज व्याज माफी योजना/२०११/ LL

दिनांक : 17 JAN 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय:- **Intrest Subsidy on Education Loan या योजनोच्या अंमलबजावणीबाबत**

संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/शै.कर्ज व्याज माफी योजना/२०११/२९५०, दि. ३०.३.२०११

उपरोक्त विषयाचे संदभाधिन पत्र कृपया पहावे.

प्रस्तुत प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, सदर योजनेचा राज्यामध्ये प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने संदर्भाधिन पत्रासोबतच्या शासनपत्रातील सूचना विचारात घेऊन आपणांस आवश्यक कार्यवाही करण्यास सूचित करण्यात आले होते. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीचा मासिक आढावा अहवाल संदर्भाधिन पत्रात नमूद केलेल्या प्रपत्रात वेळोवेळी शासनास व संचालनालयास सादर करण्याबाबत ही आपणास सूचित करण्यात आले होते. तथापि, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास अद्याप आपल्या कार्यालयाकडून प्राप्त झाला नाही.

वरील बाबत विद्यार्थी, पालक व लोकप्रतिनिधींकडून सदर प्रकरणी विचारणा करण्यात येत असून याबाबत विधानसभा तारांकित प्रश्न सुध्दा उपस्थित होत असून त्याबाबतची माहिती संचालनालयाकडून शासनाद्वारे मागविण्यात येते. मात्र विभागीय कार्यालयाकडून सदर माहिती अप्राप्त असल्यामुळे शासनास माहिती सादर करणे शक्य होत नाही. तसेच सदर योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांना मिळणा-या रोजगाराविषयीची माहिती संबंधित संस्थेकडून आपल्या कार्यालयात वेळोवेळी संकलीत करून ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि, सदरची माहिती या कार्यालयास अद्याप प्राप्त झालेली नाही.

तरी प्रस्तुत प्रकरणी आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावर करुन अहवाल सादर करण्यात यावा.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

महसंचालक संचालक

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/13/७१९

दिनांक : 10 FEB 2013

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद अधिनस्त प्राचार्य, पदविका, पदवी संस्था (शासकिय, अनुदानीत, विनाअनुदानीत) यांना माहितीव कार्यवाहीस,

सह संचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद.

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना सुचित करण्यात येते की, सदर पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर "शैक्षणिक कर्ज व्याज माफी योजना" या शिर्षाखाली प्रसिद्ध करावे.